N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** यवतमाळ **P.S.(ठाणे):** उमेरखेड
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0471 **Year (वर्ष):** 2024
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**08/07/2024 20:55

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 08/07/2024
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 08/07/2024
**Time From (वेळेपासून):** 12:43 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:54 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 08/07/2024 **Time (वेळ):** 20:37 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 040
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 08/07/2024 20:37 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 00.50 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** ढाणकी बिटरगांव रोडवरील, हनुमान मंदिर, प्रवासी थांबा, , उमरखेड , 445206

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) Name (नाव): दिनेश अशोक गायकवाड

(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :

(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष): 1993

(d) Nationality (राष्ट्रीयत्व): भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No.(पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | बिटरगांव बुद्रुक ,उमरखेड ,उमेरखेड,यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | बिटरगांव बुद्रुक ,उमरखेड ,उमेरखेड,यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.):

Mobile (मोबाइल नं.): 91-7030440020

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री.गजानन बद्रीसिंग रत्ने | | | 1. गणेशवाडी पोस्ट बिटरगाव बु, उमरखेड,उमेरखेड,यवतमाळ, महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 5,000/ रूपये ज्यात 500/ रूपये दराच्या 10 चलनी नोटा | 5,000.00 |

**Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

5,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

अँ.क.ब्युरो, यवतमाळकॅम्प - उमरखेड दिनांकः 08/07/2024फिर्याद
मी श्री.दिनेश अशोक गायकवाड वय 31 वर्ष धंदा शेती/शिक्षण रा.बिटरगांव (बुद्रुक) ता.उमरखेड जि.यवतमाळ नमुद पत्यावर माझे कुटुंबासह राहतो. ग्रामपंचायत बिटरगांव (बुद्रुक) ता.उमरखेड जि.यवतमाळ येथील श्री.गजानन रत्ने, ग्राम रोजगार सेवक यांनी मला लाचेची मागणी केल्याने, मी त्यांचेविरुध्द लाच मागणीची तक्रार देणेकरीता दिनांक 05/07/2024 रोजी पोलीस उपअधीक्षक श्री.उत्तम नामवाडे, अँन्टी करप्षन ब्युरो यवतमाळ यांना फोनव्दारे माझे तोंडी तक्रार सांगीतली की, "माझे वडिलांनी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण योजना अंतर्गत माहे जानेवारी/2024 मध्ये ग्रामपंचायत बिटरगांव (बुद्रुक) व्दारे पंचायत समिती, उमरखेड जि.यवतमाळ येथे शेतीमध्ये गुरांचा गोठा मिळणेकरीता अर्ज केला होता. सदर अर्ज मंजुर करणेकरीता ग्रामपंचायत बिटरगांव (बुद्रुक) चे ग्राम रोजगार सेवक श्री.गजु रत्ने हे मला 7,000/- रूपयाची लाचेची मागणी केली आहे. तरी त्यांनी मला लाचेची मागणी केल्यास व स्विकारल्यास त्यांचेवर कायदेषीर कार्यवाही करण्यात यावी" अषी मी फोनव्दारे तोंडी तक्रार सांगुन पोलीस उपअधीक्षक श्री.उत्तम नामवाडे यांना विनंती केली की, "ग्रामपंचायत बिटरगांव (बुदुक) चे ग्राम रोजगार सेवक श्री.गजानन रत्ने हे मला उमरखेड येथे दिनांक 08/07/2024 रोजी भेटणार असल्याने माझे तक्रारीची पडताळणी ही दिनांक 08/07/2024 रोजी करावी व माझे यवतमाळ येथे येणे होत नसल्याने तुम्ही उमरखेड येथे येवुन माझे तक्रारीची पडताळणी करावी" अशी मी विनंती केल्याने दिनांक 08/07/2024 रोजी पोलीस उपअधीक्षक श्री.उत्तम नामवाडे, पोलीस स्टाफ व माझे तक्रारीची पडताळणी करणेकरीता जिल्हा हिवताप कार्यालय, यवतमाळ येथील पंच क्र. 1) श्री.योगेश पंढरी अरसोड, वय 27 वर्ष, पद नियमीत क्षेत्र कर्मचारी नेमणुक जिल्हा हिवताप कार्यालय यवतमाळ, पंच क्रं. 2) श्री.ऋशीकेष गजानन चिंडाले, वय 22 वर्ष, पद स्वच्छक नेमणुक जिल्हा हिवताप कार्यालय यवतमाळ असे दोन शासकीय पंचासह उमरखेड षहराच्या बाहेर आले व माझी भेट घेतली. यानंतर पोलीस उपअधीक्षक श्री.उत्तम नामवाडे यांनी दोन्ही पंचाना माझी व मला पंचाची ओळख करुन दिली. त्यांना मी सांगीतलेली तोंडी तक्रार माझे हस्ताक्षरात खालीलप्रमाणे लिहुन दिली.
मी बिटरगांव(बुद्रुक) ता.उमरखेड जि.यवतमाळ येथील रहिवसी असुन माझे वडिल नामे अशोक नागोराव गायकवाड यांचे नावाने मौजा मन्याळी ता.उमरखेड जि.यवतमाळ येथे शेती आहे. माझे वडिलांनी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण योजना अंतर्गत माहे जानेवारी/2024 मध्ये ग्रामपंचायत बिटरगांव (बुद्रुक) व्दारे पंचायत समिती, उमरखेड जि. यवतमाळ येथे सदर शेतीमध्ये गुरांचा गोठा मिळणेकरीता अर्ज केला होता. माझे वडिलांनी गुरांच्या गोठा संबधी दिलेल्या अर्जाबाबत ग्रामपंचायत बिटरगांव (बुद्रुक) चे ग्राम रोजगार सेवक श्री.गजु रत्ने यांचेकडे मी सात-आठ दिवसाआधी विचारपुस केली असता, त्यांनी मला म्हटले की, "तुझे वडिलांनी दिलेल्या गुरांच्या गोठयाबाबतचा अर्ज मंजुर करून देतो तु मला 7,000/- रूपये दे" असे म्हणुन मला लाचेची मागणी केली. मला त्यांना लाचेची रक्कम दयावयाची नसल्याने मी त्यांचे विरुध्द आज रोजी लाच मागणीची तक्रार देत आहे. माझी व ग्रामपंचायत बिटरगांव (बुद्रुक) चे ग्राम रोजगार सेवक श्री.गजु रत्ने यांचे मध्ये दुश्मनी नसुन देवाणघेवाणीचा उसणवारीचा कोणताही व्यवहार आमचे मध्ये नाही. तरी त्यांनी मला लाचेची मागणी केल्यास व स्विकारल्यास त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी ही विनंती. अशी लेखी तक्रार दिली. माझी लेखी तक्रार दोन्ही पंचाना वाचण्यास देण्यात आली. माझी तोंडी व लेखी तक्रारीतील मजकुर एकच असल्याची खात्री झाल्याने दोन्ही पंचानी व पोलीस उपअधीक्षक श्री.उत्तम नामवाडे यांनी तक्रारीवर स्वाक्षरी केली. पोलीस उपअधीक्षक श्री.नामवाडे यांनी मला सांगितले की, ग्राम रोजगार सेवक श्री. रत्ने यांची प्रत्यक्ष भेट घेऊन कामासंबधाने चर्चा करावी. यावेळी पडताळणी कार्यवाही दरम्यान होणारे संभाषण हे व्हॉईस रेकॉर्डरव्दारे सॅनडिस्क कंपनीचे 32 जी.बी.मेमरी कार्ड मध्ये ध्वनीमुद्रीत होणार असल्याचे सांगीतले. तसेच व्हॉईस रेकॉर्डरचे प्रात्यक्षीक सुध्दा करून दाखविण्यात आले. सविस्तर कार्यवाही पडताळणी पुर्व प्रमाणे करण्यात आली.यानंतर श्री.रत्ने, ग्राम रोजगार सेवक यांना मी फोन केला असता त्यांनी मला सांगीतलेली की, ते तहसिल

कार्यालय, उमरखेड येथे येत आहेत त्यामुळे माझे विनंतीवरुन दिनांक 08/07/2024 रोजी पडताळणी करण्यात आली, व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन माझे गळयात शर्टाचे आतमध्ये लटकविला, ती वेळ 12/43 वाजताची होती. मी व पंच क्र 1) श्री.अरसोड, नियमीत क्षेत्र कर्मचारी यांना श्री.रत्ने, ग्राम रोजगार सेवक यांची भेट घेणेकरीता तहसिल कार्यालय, उमरखेड जि.यवतमाळ येथे गेलो असता तेथे मी पंच क्र 1) श्री.अरसोड यांचे समक्ष ग्राम रोजगार सेवक श्री.रत्ने यांची भेट घेतली व माझे वडिलांच्या गुरांच्या गोठयांचा अर्जा संबधाने विचारणा केली असता, त्यांनी माझे वडिलांच्या गुरांच्या गोठयाचा अर्ज मंजुर करणेकरीता 7,000/- रूपयाची लाचेची मागणी करून दिनांक 08/07/2024 रोजी 5,000/-रूपये दे व उर्वरीत 2,000/- रूपये नंतर देजो असे म्हणुन लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. यानंतर मी व पंच क्रमांक 1) श्री.अरसोड असे पडताळणी पथकाजवळ परत आलो असता माझे जवळील व्हाईस रेकॉर्डर पोलीस उपअधीक्षक श्री. नामवाडे यांनी घेउन बंद केला, ती वेळ 13/08 वाजताची होती. पोलीस उपअधीक्षक श्री. नामवाडे यांनी मला व पंच क्र 1 यांना रवाना केल्यापासुनची हकीकत विचारली असता मी व पंच क्र 1 यांनी सविस्तर हकीकत पंचासमक्ष सांगितली. सविस्तर कार्यवाही पडताळणी कार्यवाही प्रमाणे करण्यात आली.सदर पडताळणी कारवाई दरम्यान ध्वनीमुद्रीत करण्यात आलेले संभाषण मी, पोलीस उपअधीक्षक श्री. नामवाडे यांनी पंचासमक्ष ऐकले त्यामध्ये लाच मागणीचा स्पष्ट उल्लेख असल्याचे आढळुन आले.यानंतर मी पंचासमक्ष पोलीस उपअधीक्षक श्री. नामवाडे यांना सांगीतले की, ग्राम रोजगार सेवक श्री.रत्ने यांनी मला लाच रक्कम घेउन लवकर बोलाविले आहे. यानंतर पोलीस उपअधीक्षक श्री. नामवाडे यांनी सापळा कार्यवाही दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबावत सुचना दिल्या, माझे विनंती वरून माझे जवळील ग्राम रोजगार सेवक श्री.रत्ने यांना देणे असलेली लाचेची रक्कम 5,000/- रु मी पंचासमक्ष पोलीस उपअधीक्षक श्री. नामवाडे यांना दिली असता त्या नोटांचे टिपण तयार करून त्या नोटांना अँन्थ्रासीन पावडर लावुन माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिष्यात ठेवण्यात आली व सविस्तर करवाई सापळापुर्व कार्यवाही प्रमाणे करण्यात आली.यानंतर व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन माझे गळयात शर्टाचे आतमध्ये लेसव्दारे लटकवीला, ती वेळ 13/43 वाजताची होती. त्यानंतर मी व पंच क्र. 1 श्री.अरसोड असे ग्राम रोजगार सेवक श्री.रत्ने यांची भेट घेणे करीता रवाना करण्यात आले. त्या दरम्यान मला श्री. रत्ने, ग्राम रोजगार सेवक यांनी मला फोनव्दारे सांगीतले की, तुम्ही ढाणकी बिटरगांव रोडवरील हनुमान मंदिर, प्रवासी थांबा जवळ या. असे सांगीतल्याने मी व पंच क्र.1 श्री.अरसोड असे ढाणकी बिटरगांव वरील हनुमान मंदिर, प्रवासी थांबा येथे गेलो व ग्राम रोजगार सेवक श्री.रत्ने यांची भेट घेतली व माझे वडिलांच्या गुरांच्या गोठयाचा अर्जा संबधाने मागीतलेल्या लाच संबंधाने विचारणा करून लाचेची मागणी केली असता मी माझे पॅन्टच्या उजव्या खिष्यामध्ये ठेवलेली अँन्थ्रासीन पावडर लागलेली लाचेची रक्कम 5,000/- रु. माझे उजवे हाताने बाहेर काढुन रोजगार सेवक श्री.रत्ने यांना दिली असता, श्री.रत्ने, ग्राम रोजगार सेवक यांनी उजव्या हाताने लाच रक्कम स्विकारली व स्वतःच्या पॅन्टच्या उजव्या चोर खिषात ठेवली.यानंतर मी माझा डावा हात वारंवार डोक्यावर फिरवुन ग्राम रोजगार सेवक श्री.रत्ने यांनी लाच रक्कम स्विकारल्याचा पुर्वनियोजीत ईशारा सापळा पथकास केला. त्यावरून पोलीस उपअधीक्षक श्री. नामवाडे, पथकातील अंमलदार यांनी तेथे लगेच येऊन पथकातील कर्मचारी पोकाँ भागवत पाटील व पोकाँ सतिष सोनोने यांनी ग्राम रोजगार सेवक श्री.रत्ने यांना ताब्यात घेतले व माझेजवळील व्हॉईस रेकॉर्डर ताब्यात घेउन पोलीस उपअधीक्षक श्री. नामवाडे यांनी बंद केला, ती वेळ 13/54 वा होती. ग्राम रोजगार सेवक श्री. रत्ने यांचा उजवा हात व पॅन्टचा उजवा चोर खिसा, लाचेच्या नोटा व माझे हात अल्ट्राव्हॉईलेट दिव्याचे प्रकाशात तपासण्यात आले असता उजव्या हातावर, पॅन्टच्या उजव्या चोर खिशावर, लाचेच्या नोटा व माझे हातावर अँन्थ्रासिन पावडरची फिकट हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. सविस्तर कार्यवाही दिनांक 08/07/2024 रोजीचे पडताळणी पुर्व, पडताळणी कार्यवाही, सापळापुर्व व सापळा कार्यवाही पंचनामा प्रमाणे करण्यात आली. एकंदरीत दिनांक 08/07/2024 रोजी पडताळणी दरम्यान पंचासमक्ष ग्राम रोजगार सेवक श्री.रत्ने यांनी मला माझे वडिलांच्या गुरांच्या गोठयाचा अर्ज मंजुर करणेकरीता 7,000/- रूपयाची लाचेची मागणी करून दिनांक 08/07/2024 रोजी 5,000/-रूपये दे व उर्वरीत 2,000/- रूपये नंतर देजो असे म्हणुन लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले व दिनांक 08/07/2024 रोजी 13/43 वा. ते 13/54 वाजता चे सापळा कार्यवाही दरम्यान ग्राम रोजगार सेवक श्री.रत्ने यांनी ढाणकी बिटरगांव रोडवरील हनुमान मंदिर, प्रवासी थांबा, उमरखेड येथे माझेकडुन पंचासमक्ष 5,000/- रूपये लाच रक्कम स्विकारली. त्यावरुन आरोपी ईतर लोकसेवक श्री.गजानन बद्रीसिंग रत्ने, वय 51 वर्ष, पद ग्राम रोजगार सेवक, नेमणूक - ग्रामपंचायत बिटरगांव (बुद्रुक)ता.उमरखेड जि. यवतमाळ रा.मु.गणेशवाडी पो.बिटरगांव(बुद्रुक)ता.उमरखेड जि.यवतमाळ यांचेविरूध्द कायदेशीर कारवाईस्तव तक्रार देत आहे.माझी वरीलप्रमाणे तक्रार मराठीत टंकलीखीत केली असुन, मी अँ.क.ब्युरो पथकासह पोलीस स्टेशन उमरखेड येथे येऊन तक्रार देत आहे, सदर तक्रार मी वाचुन पाहली ती माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

**Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
NARENDRA LAXMANRAO PUND
**Rank** (पद): PC (Police Constable) **No.**(क्र.): 16401000362NLP
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):
Gaikwad

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

प्रत मिळाली
Gaikwad

स्टेशन डायरी अमलदार
पो.स्टे. उमरखेड जि. यवतमाळ
07231/237123

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): SANJAY DAGDUJI SO
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN77009